संक्षिप्त




# शांततेचा संदेश देण्यासाठी मुंबईतील दोन व्यावसायिक निघाले जगप्रवासाला

**मुंबई :** 'जग जोडा, शांतता अनुभवा, जीवन साजरे करा' असा संदेश देत मुंबईतील व्यावसायिक प्रवीण मेहता आणि डॉक्टर सुधीर बलदोटा यांनी ८ एप्रिलला मुंबईतून जगप्रवासाला सुरुवात केली. ते आशिया, युरोप, दक्षिण अमेरिका आणि उत्तर अमेरिका या ४ उपखंडांतून तसेच ६० देशांमधून प्रवास करत ३०० दिवसांमध्ये ७० हजार किलोमीटर अंतर पूर्ण करणार आहेत. यादरम्यान ते विविध देशांमधील शास्त्रज्ञ, संशोधक, कलाकार, सामाजिक व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, रेडिओ जॉकी, लेखक, शिक्षक अशा १२० मान्यवरांना भेटणार आहेत. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टने या उपक्रमाला पाठबळ दिले आहे.